## राज्याचा हवामान, पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक ०८/०७/२०२४ अखेरचा खरीप हंगाम २०२४-२५ चा साप्ताहिक अहवाल.

❖ **हवामान** : राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते. कोंकण विभागात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. कोल्हापूर व अमरावती विभागात तुरळक ठिकाणी जोरदार तर काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली. नाशिक, पुणे, लातूर व नागपूर विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली. छत्रपती संभाजीनगर विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

❖ **खरीप हंगाम-२०२४-२५ :**

❖ **पिक परिस्थिती :**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४२.०२ लाख हेक्टर असून दि.०८ जुलै, २०२४ अखेर १११.५४ लाख हेक्टर क्षेत्रावर (७९%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५२.९७ लाख हेक्टर असून ११२.४७ लाख हेक्टर क्षेत्रावर (७४%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.०८.०७.२०२३ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र ४०.९९ लाख हे. (सरासरीशी २७%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र ४०.६६ लाख हे. (सरासरीशी २९%) होते.

- ➢ भात व नाचणी पिकांच्या रोपवाटिका तयार करण्याची कामे पुर्ण झाली असून रोपवाटिकेतील भात रोपे अवस्थेत आहे.
- ➢ भात पिकाच्या पुर्नलागवडीच्या कामे सुरु आहेत.
- ➢ ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, भुईमूग, कापूस पिकांच्या पेरण्या सुरु आहेत.
- ➢ पेरणी झालेली पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
- ➢ पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.
- ➢ अमरावती व नागपूर विभागात पिकांच्या पुढील वाढीसाठी पावसाची आवश्यकता आहे.

**पर्जन्यमान (२०२४)**

दि.१ जून ते ०८ जुलै, २०२४ या कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस २९३.० मि.मी. असून दि.०८ जुलै, २०२४ पर्यंत ३१६.२ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १०७.९ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.०८.०७.२०२३ अखेर २१०.० मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ७१.७ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते दि.०८ जुलै, २०२४ अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | ---- |
| २ | २५ ते ५० % | ० | ---- |
| ३ | ५० ते ७५ % | ३ | कोल्हापूर, भंडारा, गोंदिया. |
| ४ | ७५ ते १०० % | ११ | ठाणे, रायगड,पालघर, नाशिक, नंदुरबार, पुणे, हिंगोली, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | २० | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगांव, धुळे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ, वर्धा. |

राज्यात दि.०८ जुलै, २०२४ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी ० तालूक्यात ० ते २५%, ७ तालुक्यात २५ ते ५०%, ४६ तालुक्यात ५० ते ७५%, ८५ तालूक्यात ७५ ते १००% तर २१७ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

### ❖ नैसर्गिक आपत्ती :


दि.०८ जुलै, २०२४ च्या प्राथमिक नजरअंदाज अहवालानुसार माहे, जून-२०२४ मधील पावसामुळे शेती व फळपिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये २५९२ हे. क्षेत्र बाधित झाले आहे. तसेच १६० हे. क्षेत्र जमीन खरडून गेलेले आहे.

### ❖ किड व रोग :


अमरावती विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर केसाळ अळीचा प्रादुर्भाव अल्प प्रमाणात आढळून येत आहे.

## खरीप हंगाम सन-२०२४-२५ मधील राज्यस्तरीय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी

(दि.०८ जुलै, २०२४ अखेर)




## खरीप हंगाम सन-२०२४-२५ मधील पिकनिहाय पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.०८ जुलै, २०२४ अखेर)



# विभाग निहाय पिक परिस्थिती

## कोकण विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.१४ लाख हेक्टर असून, दि.०८ जुलै, २०२४ अखेर ०.७४ लाख हेक्टर क्षेत्रावर (१८%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती** :
  - भात व नाचणी पिकांच्या रोपवाटिका तयार करण्याची कामे पुर्ण झाली असून रोपवाटिकेतील भात रोपे अवस्थेत आहे.
  - भात पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत.
  - इतर पिकांच्या पेरण्या सुरु आहेत.
- **किड व रोग** : निरंक.

## नाशिक विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.६५ लाख हेक्टर असून, दि.०८ जुलै, २०२४ अखेर १५.७९ लाख हेक्टर क्षेत्रावर (७६%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती** :
  - बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन व कापूस पिकांच्या पेरण्या सुरु आहेत. पुरेशा पावसामळे पेरणीच्या कामांना वेग आला आहे.
  - पेरणी झालेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.
- **किड व रोग** : निरंक.

## पुणे विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १०.६५ लाख हेक्टर असून, दि.०८ जुलै, २०२४ अखेर १०.१८ लाख हेक्टर क्षेत्रावर (९६%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती** :
  - भात व नाचणी पिकांच्या रोपवाटिका तयार करण्याची कामे पुर्ण झाली असून रोपवाटिकेतील भात रोपे अवस्थेत आहे.
  - भात पिकाच्या पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत.
  - बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन व कापूस पिकांच्या पेरण्यांना वेग आला आहे.
  - पेरणी झालेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.
- **किड व रोग** : निरंक.

## कोल्हापूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.२८ लाख हेक्टर असून, दि.०८ जुलै, २०२४ अखेर ५.३३ लाख हेक्टर क्षेत्रावर (७३%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - भात व नाचणी पिकांच्या रोपवाटिका तयार करण्याची कामे पुर्ण झाली असून रोपवाटिकेतील भात रोपे अवस्थेत आहे.
  - भात व नाचणी पिकांच्या पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत.
  - भात पिकाच्या धुळवाफ पेरण्या झाल्या असून पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
  - ज्वारी, बाजरी, मका, तूर, सोयाबीन, उडीद, मूग पिकांच्या पेरण्या प्रगतीपथावर आहेत.
  - पेरणी झालेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.
  - पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.
- **किड व रोग : निरंक.**

## छ.संभाजीनगर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.९० लाख हेक्टर असून, दि.०८ जुलै, २०२४ अखेर १८.९१ लाख हेक्टर क्षेत्रावर (९०%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - विभागात खरीप हंगामातील बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, कापूस, भूईमूग पिकांच्या पेरण्या प्रगतीपथावर आहेत.
  - पेरणी झालेली पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
- **किड व रोग : निरंक.**

## लातूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.६७ लाख हेक्टर असून, दि.०८ जुलै, २०२४ अखेर २४.७२ लाख हेक्टर क्षेत्रावर (८९%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - विभागात खरीप हंगामातील ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, कापूस पिकांच्या पेरण्यांना वेग आला आहे.
  - पेरणी झालेली पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
- **किड व रोग :** निरंक.

## अमरावती विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३१.५९ लाख हेक्टर असून, दि.०८ जुलै, २०२४ अखेर २६.३० लाख हेक्टर क्षेत्रावर (८३%) पेरणी झाली आहे.

- **पिक परिस्थिती :**
  - विभागात खरीप हंगामातील मका, ज्वारी, मूग, उडीद, तूर, सोयाबीन, कापूस पिकांच्या पेरण्या प्रगतीपथावर आहेत.
  - पेरणी झालेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.
  - पिकांच्या पुढील वाढीसाठी पुरेशा पावसाची आवश्यकता आहे.

- **किड व रोग :**

  विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर केसाळ अळीचा प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## नागपूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.१५ लाख हेक्टर असून, दि.०८ जुलै, २०२४ अखेर ९.५६ लाख हेक्टर क्षेत्रावर (५०%) पेरणी झाली आहे.

- **पिक परिस्थिती :**
  - भात व नाचणी पिकांच्या रोपवाटिका तयार करण्याची कामे पुर्ण झाली असून रोपवाटिकेतील भात रोपे अवस्थेत आहे.
  - भात पिकाच्या पुर्नलागवडीची कामांना सुरुवात झाली आहे.
  - सोयाबीन, तूर, कापूस, ज्वारी पिकांच्या पेरणीची कामे सुरु आहेत.
  - ज्वारी, सोयाबीन, तूर, कापूस पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत असून पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

- **किड व रोग :** निरंक.

- **प्रधानमंत्री पिक विमा योजना (खरीप-२०२४)** (दि.०८.०७.२०२४ अखेर) :
  - **शेतकरी सहभाग संख्या : ८४.६३ लाख**
  - **विमा संरक्षित क्षेत्र : ५४.०९ लाख हे.**

# महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगाम २०२४-२५ मधील मुख्य पिकाखालील दि.०८.०७.२०२४ अखेरचा पिक पेरणी अहवाल

(क्षेत्र हेक्टरमध्ये)

| अ.क्र. | पिके | पाच वर्षाचे सरासरी क्षेत्र (२०१६-१७ ते २०२०-२१) | मागील वर्षाची दि.०८.०७.२०२३ रोजीची पेरणी | सन २०२४-२५ मधील दि.०८.०७.२०२४ अखेर प्रत्यक्ष पेरणी | पेरलेल्या क्षेत्राची पाच वर्षाच्या सरासरी क्षेत्राशी टक्केवारी (२०१६-१७ ते २०२०-२१) | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | स्तंभ ५ ची स्तंभ ३ च्या तुलनेत % | स्तंभ ५ ची स्तंभ ४ च्या तुलनेत % |
| १ | भात | १५०८३७४ | १०६५१९ | २४५९६१ | १६ | २३१ |
| २ | खरीप ज्वारी | २८८६१५ | २२३०६ | ७६३७१ | २६ | ३४२ |
| ३ | बाजरी | ६६९०८९ | ३४१३८ | ३२६४४१ | ४९ | ९५६ |
| ४ | रागी | ७८१४९ | १८७२ | १०२३६ | १३ | ५४७ |
| ५ | मका | ८८५६०८ | १८६४१७ | ८४५६०४ | ९५ | ४५४ |
| ६ | इतर तृणधान्य (राजगिरा, कोडू/कोद्रा, कुटकी, वरई, बार्टी, सावा, राळा, इतर) | ४०४४५ | १९१५ | १०२९३ | २५ | ५३७ |
| **एकूण तृणधान्य** | | **३४७०२७९** | **३५३१६७** | **१५१४९०६** | **४४** | **४२९** |
| ७ | तूर | १२९५५१६ | ३३५१७० | ९९४४०५ | ७७ | २९७ |
| ८ | मुग | ३९३९५७ | २५५३२ | १९४८२७ | ४९ | ७६३ |
| ९ | उडीद | ३७०२५२ | २०३८१ | २९२१३४ | ७९ | १४३३ |
| १० | इतर कडधान्य (कुळीथ, चवळी, मटकी, राजमा, इतर) | ७८८४५ | २०९३ | ३७७८९ | ४८ | १८०५ |
| **एकूण कडधान्य** | | **२१३८५७१** | **३८३१७६** | **१५१९१५५** | **७१** | **३९६** |
| **एकूण अन्नधान्य** | | **५६०८८५०** | **७३६३४४** | **३०३४०६१** | **५४** | **४१२** |
| ११ | भुईमुग | १९१५७५ | ३२३९४ | १११६३९ | ५८ | ३४५ |
| १२ | तीळ | १५१६२ | ५९४ | ५८९६ | ३९ | ९९३ |
| १३ | कारळ | १२४६० | ३०६ | ८०८ | ६ | २६४ |
| १४ | सुर्यफुल | १३७८० | ४१ | ६६२१ | ४८ | १६३४३ |
| १५ | सोयाबीन | ४१४९९१२ | ११०६९३० | ४३१९४६६ | १०४ | ३९० |
| १६ | इतर गळीतधान्य (एरंडी, इतर) | ९४५२ | २९४ | १०४३ | ११ | ३५४ |
| **एकूण तेलबिया** | | **४३९२३४०** | **११४०५५८** | **४४४५४७२** | **१०१** | **३९०** |
| **१७** | **कापूस** | **४२०११२८** | **२१८९०६०** | **३६७४३९३** | **८७** | **१६८** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊस वगळून)** | | **१४२०२३१८** | **४०६५९६१** | **१११५३९२६** | **७८.५४** | **२७४** |

टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित.